महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना
अधिनियम १९६६.
महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना
अधिनियम १९६६ चे कलम ३७
(१अ) अन्वये महाराष्ट्र औद्योगिक
विकास महामंडळाचे विकास
नियंत्रण नियमावलीमध्ये फेरबदल

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ
"उद्योग सारथी" , मरोळ औद्योगिक क्षेत्र, महाकाली गुहा मार्ग,
अंधेरी (पुर्व), मुंबई ४०००९३.
दि. ३ फेब्रुवारी २०२२

**सुचना**

क्र.मऔविम/मुनि/A-३८५४९/२०२२

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने, ज्या क्षेत्राकरीता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास (यानंतर "म.औ.वि.म" संबोधिलेले) महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे (यानंतर "उक्त अधिनियम" असा उल्लेख केलेला ) कलम ४०(१अ) अन्वये "अधिसुचित क्षेत्राकरीता" विशेष नियोजन प्राधिकरण (यानंतर "विनिप्रा" असे संबोधिलेले ) म्हणुन नियुक्त करण्यात आले आहे, त्या क्षेत्राकरीता नगर विकास विभागाची अधिसूचना क्र. टीपीबी/४३०८/४६५/सीआर ६४/०८/नवि-११, दि. ३१ ऑगस्ट, २००९ नुसार विकास नियंत्रण नियमावली मंजूर केली असून, ती दि.२४ सप्टेंबर, २००९ पासून अंमलात आलेली आहे;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने, उक्त अधिनियमाचे कलम ३७(१अअ) नुसार प्राप्त अधिकाराचा वापर करुन, नगर विकास विभागाची अधिसूचना क्र. टीपीबी ४३१४/२०/आर-३२/२०१४/नवि-११, दि. १ ऑगस्ट, २०१५ नूसार, ज्यासाठी म.औ.वि.म विनिप्रा आहे, अशा एकात्मिक औद्योगिक क्षेत्राकरीता नियमावली लागू करण्यासाठी सदर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये फेरबदल मंजूर करण्यात आला आहे.

आणि ज्याअर्थी, बदलत्या गरजांचा विचार करून, म.औ.वि.म. ने अस्तित्वातील विकास नियंत्रण नियमावली बदलून नवीन नियमांचा संच तयार करण्याचा निर्णय घेतला व त्यानुसार महाराष्ट्र राज्यातील म.औ.वि . म. चे सर्व क्षेत्राकरीता विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीचे प्रारुप तयार केले आहे.

आणि ज्याअर्थी, म.औ.वि.म. ने दि.३०/११/२०२१ चे महामंडळाचे बैठकीत, प्रारुप सर्वसमावेशक विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमवाली २०२२ (यानंतर "प्रारुप सीडीसीपीआर" असे संबोधिलेले) वर जनतेकडून सूचना व हरकती मागविण्यासाठी ठराव पारित केलेला आहे.

आणि त्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम३७ (१) नुसार प्राप्त अधिकारात, म.औ.वि.म. हे अस्तित्वातील विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली बदलून नवीन प्रारुप सर्वसमावेशक विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियामवली २०२२ लागू करण्याबाबत इरादा घोषित करीत आहे व त्याकरीता सदर प्रारूप सर्वसमावेशक विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीवर ही सूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द झाल्याचे दिनांकापासून एक महिन्याचे आत जनतेकडून सूचना व हरकती मागविण्यासाठी, ही सूचना प्रसिध्द करीत आहे.

सदर फेरबदलावर कोणतीही सूचना/हरकती असल्यास त्या मुख्य नियोजक, म.औ.वि.म "उद्योग सारथी", मरोळ औद्योगिक क्षेत्र, महाकाली गुहा मार्ग, अंधेरी (पुर्व), मुंबई ४०००९३ यांचेकडे पाठवाव्यात. ही सूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द झाल्यापासून एक महिन्याचे कालावधीत प्राप्तसूचनांचा सदर फेरबदल प्रस्ताव शासनास मंजूरीसाठी सादर करण्यापुर्वी विचार करण्यात येईल.

ही सूचना प्रारुप सीडीसीपीआर सह, सर्व कार्यालयीन कामकाजाचे दिवशी उक्त कालावधीमध्ये खालील कार्यालयात जनतेच्या अवलोकनार्थ ठेवण्यात आली असून, ती https:www.midcindia.org या संकेत स्थळावर सुध्दा उपलब्ध आहे.

१. मुख्य नियोजक, म.औ.वि.म. "उद्योग सारथी", मरोळ औद्योगिक क्षेत्र, महाकाली गुहा मार्ग, अंधेरी (पुर्व), मुंबई ४०००९३.
२. म.औ.वि.म. ची सर्व प्रादेशिक कार्यालये.

मुंबई ९३
दिनांक: ०३/०२/२०२२

**(प्रतिभा भदाणे)**
मुख्य नियोजक,
महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ,
मुंबई ९३